CIN: L74999MH2016PLC284731
Nirmitee Robotics India Limited
(Formerly Known as Nirmitee Robotics India Private Limited)
H.O.:D3/2, MIDC Hingna, Nagpur. (MS) India 440028
Phone:+91-9422 881 677, Email:info@nirmiteerobotics.com
www.nirmiteerobotics.com

To
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai - 400001

**Scrip Code:** 543194

**Sub:** Notice published by way of an advertisement in respect of Extra Ordinary General Meeting (EGM) of the Company.

**Ref:** Regulation 44 and 47 read with Regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015

Dear Sir/Ma'am,

Pursuant to regulation 44 and 47 read with regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith the copies of newspaper advertisements published in **"Sakal Today"** Nagpur Circulation (Marathi Edition) and the **"The Indian Express"** National Circulation (English Edition) on 14th January 2022 informing about the EGM of Company and e-voting.

For your information and record.

Kindly acknowledge and oblige.

Thanking you,
Yours faithfully,
**For Nirmitee Robotics India Limited**
AKHILESH GIRISH MISHRA
Digitally signed by AKHILESH GIRISH MISHRA
Date: 2022.01.14 13:12:04 +05'30'

**Akhilesh Girish Mishra**
Company Secretary cum Compliance Officer
**Membership No:** A65835
**Date:** 14th January 2022
**Place:** Nagpur

## अवती भवती

### वानाडोंगरी नगरपरिषदेत कोरोनाचा विस्फोट

**हिंगणा :** शनिवार-रविवारी 'पिकनिक' वरून परतलेल्या वानाडोंगरी नगरपरिषदेच्या तब्बल २१ अधिकारी-कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाली आहे. यात मुख्याधिकारी अर्चना मेंढे यांचाही समावेश आहे. त्यामुळे नगरपरिषदेचे संपूर्ण कामकाज बंद पडले आहे. कोरोना काळात काढलेली 'पिकनिक' नगर परिषदेला चांगलीच भोवली. शनिवार व रविवार साप्ताहिक सुट्टी असल्याने मुख्याधिकारी अर्चना मेंढे यांच्यासह सर्वच विभागातील सुमारे २५ अधिकारी-कर्मचारी पेंच प्रकल्प येथे मुक्कामी 'पिकनिक'साठी गेले होते .सोमवारी कामावर परतल्यावर काही कर्मचारी आजारी पडले. त्यामुळे सर्वांची कोरोना आर्टीपीसीआर चाचणी करण्यात आली. बुधवारी मुख्याधिकारी व इतर सर्व विभागातील २० अधिकारी-कर्मचारी असे एकूण २१ कर्मचाऱ्यांचे तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आले. आज माहिती मिळताच नगरपरिषदेच्या कार्यालयात सॅनिटायझरची फवारणी करण्यात आली. जवळपास सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याने कामकाज बंद करण्यात आले. काही कंत्राटी कर्मचारी येणाऱ्या नागरिकांना याविषयी माहिती देऊन परत पाठविण्याचे काम करीत होते. नगरपरिषदेत मागील दोन दिवसात कामासाठी आलेल्या नागरिकांमध्ये सुद्धा भीतीचे वातावरण आहे .नियमांची पायमल्ली करून पिकनिक आयोजित केली. याची चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. मुख्याधिकारी कधीच लोकप्रतिनिधी किंवा कुणाचेही काही ऐकून घेत नाही. लोकप्रतिनिधीना विचारात न घेता पिकनिकच्या आयोजनाने लोकप्रतिनिधी सुद्धा संतापले आहेत.

### शेतात गळफास घेऊन युवकाची आत्महत्या



रवींद्र पोटभरे

टेकाडीः नागपूरवरुन बुधवार रात्री कांद्री येथे घरी जाण्यासाठी निघालेल्या तरुणाचा मृतदेह गुरुवारी सकाळी नागपूर-जबलपूर चौपदरी महामार्गालगत असलेल्या 'व्हाइट हाऊस' लॉजच्या मागे त्याच्याच शेतातील बोराच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. रवींद्र रामलाल पोटभरे (३६, वैशालीनगर, बिनाकी मंगळवारी, नागपूर) असे मृताचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार रात्री रवींद्रने कांद्री (कन्हान) येथे राहणाऱ्या भावाला फोनवरून घरी येत असल्याची माहिती दिली. मात्र रात्रीचे साडेदहा वाजूनही रवींद्र घरी न पोहोचल्याने त्याच्या भावाने फोन करून त्याची विचारणा केली. रवींद्रने घरी पोहोचण्यास उशीर होणार असल्याचे सांगून मोबाइलची बॅटरीही संपल्याचे सांगितले. रवींद्र रात्रभर घरी पोहोचला नाही. सकाळी शिवारातील शेतकरी शेतात जात असताना मृत शेतातील झाडाला दुपट्ट्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला.

# डिगडोह नगरपरिषदेत की महानगरपालिकेत?

## जनतेत मतमतांतरे, शासनाच्या पत्रावर कार्यवाही का नाही? सात वर्षांनंतर आली जाग

**लढा डिगडोहच्या विकासाचा**

सकाळ वृत्तसेवा

**हिंगणा, ता.१३ :साठ हजार लोकसंख्येची सर्वात मोठी डिगडोह (देवी) ग्रामपंचायत असून तिचे सद्या नगरपरिषेदत रुपांतरण व्हावे, ही मागणी जोर धरत असताना परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाच्या पत्राच्या आधारे नगरपरिषदेचा मुद्दा खोडून काढला व डिगडोहचा ग्रामपंचायतीचा महानगरपालिकेतच समावेश व्हावा, असा मुद्दा उपस्थित केला. सामाजिक कार्यकर्ते गणेश काळबांडे यांनी नगरपालिकेचा मुद्दाच जनतेची दिशाभूल करणारा असल्याचे म्हटले आहे. त्याऐवजी शासनाने महानगरपालिकेत ग्रामपंचायतचा समावेश करण्यासाठी कार्यवाहीच्या पूर्तीसाठी दिलेल्या पत्राचे काय झाले, असा त्यांनी प्रतिप्रश्न केला.**





डिगडोहः परिसरातील अस्ताव्यस्त विस्तारलेले डिगडोह गाव.



गणेश काळबांडे

हिंगणा तालुक्यातील डिगडोह-निलडोह क्षेत्र महानगरपालिका नागपूर क्षेत्रात समाविष्ट करण्यात यावे, असे पत्र राज्य शासनाच्या नगरविकास विभाग मंत्रालयाच्या कक्ष अधिकाऱ्यांकडून १३ ऑगष्ट २०१५ला काढण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगर प्रशासन शाखेच्या प्रभारी अधिकाऱ्यांचे हे पत्र जिल्हा परिषदेमार्फत १३ ऑक्टोबर २०१५ डिगडोह (देवी) ग्रामपंचायतला मिळाले. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०१५ रोजी ग्रामपंचायतमध्ये मासिक सभेत हा विषय ठेवण्यात आला. मंत्रालयाच्या नगरविकास विभाग प्रशासन शाखा व जिल्हाधिकारी यांच्या महानगर पालिकेच्या पत्राविरोधात नगरपरिषदेचा ठराव घेण्यात आला. यासाठी ग्रामपंचायतने वार्ड सभा व ग्रामसभा घ्यायला हवी होती. पण दोन वर्षांपासून ग्रामपंचायतने काहीही केले नाही. दोन वर्षानंतर २६ जानेवारी २०१८ रोजी ग्रामपंचायतने ग्रामसभा बोलाविली. डिगडोह देवी नगरपरिषदेचा मासिक सभेचा १६नोव्हेंबर२०१५रोजी झालेला ठराव ग्रामपंचायतने काहीही कार्यवाही न केल्यामुळे नामंजूर झाला, असे गणेश काळबांडे यांनी सांगितले.

परंतू काही दिवसांअगोदर जि.प. व पं.स निवडणूक होती. त्यामध्ये काही लोकांचा पराभव झाला असता राजकारणाचा पवित्रा घेऊन सात वर्षांनी आता पराभूत झालेल्या लोकांना नगरपरिषद आठवली काय, असा प्रश्न करुन राजकीय उद्देश ठेवून नागरिकांना संभ्रमात ठेवण्याचा हा प्रकार असल्याचे काळबांडे म्हणाले.

### महानगरपालिकेच्या सोयी

डिगडोह देवी ग्रामपंचायत वार्ड क्र.५ हा संपूर्ण राज्य राखीव बल दलगट क्र.४ वसाहतीत येत असून येथे मनपा येथूनच पिण्याचे पाणी व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रोडची कामे होतात. यामध्ये ग्रामपंचायतचा काहीही संबंध नसतो. तसेच नागपूर महानगर पालिकेच्या महामेट्रोचा सुद्धा डिगडोह वसाहतीला फायदाच होतो. काही परिसरात सेप्टी टँक खाली करण्यासाठी महानगरपालिकेच्या गाड्या बोलाविल्या जातात. डिगडोह वसाहतीत राहणारे सर्वच नागरिक जन्माचे दाखलेसुद्धा महानगरपालिकेकडूनच घेतात. डिगडोह ग्रामपंचायतचे सर्व नागरिक महानगरपालिका आधार घेतात. शाळा, महाविद्यालये, न्यायालयसुद्धा महानगरपालिकेचा आधार घेतात. डिगडोह देवी ग्रामपंचायत ही नागपूर महानगरपालिकेच्या सिमेलगत आहे.



**फक्त राजकीय हेतूने नागरिकांना संभ्रमात ठेऊन चालणार नाही. सत्य जे आहे ते नागरिकांसोर ठेवा. मंत्रालयाचा नगरविकास विभाग, जिल्हाधिकारी, आमदार समीर मेघे यांचे महानगरपालिकेत डिगडोहला समाविष्ट करा, असे पत्र आहे. वार्डात विशेष सभा घेऊन नगरपरिषद व महानगरपालिकेचे फायदे व तोटे याबाबत चर्चा केल्यानंतरच नागरिकांचा निर्णय हा अंतिम राहिल. पण डिगडोह देवी ग्रामपंचायतने १३ ऑक्टोबर २०१५पासून काहीही कार्यवाही का केली नाही? नागरिकांना जाणीवपूर्वक संभ्रमात ठेवले आहे. आता सर्व सत्य बाजू जनतेसमोर ठेवावी. खरे काय ते तपासून पाहावे, नंतरच हा निर्णय घावा.**
**-बंडू बोंडे,** ग्रा.पं.सदस्य



**डिगडोह ग्रामपंचायतीला महानगरपालिकेत समाविष्ट करा, असे स्थानिक आमदार समीर मेघे, नगरविकास विभाग मंत्रालय व जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट पत्र आहे. तरी येथील काही नेते स्वतःच्या स्वार्थापोटी नागरिकांना संभ्रमात ठेऊन नगपरिषद करण्यासाठी जनतेला वेठीस धरीत आहेत. परंतु असे होणार नाही. कारण राज्य शासनाला महानगरपालिकेत समाविष्ट करायचे आहे. महानगरपालिकेचा नागरिकांचा कोणताच तोटा नसून उलट सर्वांना फायदाच होणार आहे.**
**-अजय शिरस्वार,** मनसे



**डिगडोह ग्रामपंचायतीचा समावेश महानगरपालिकेत होवो अथवा नगरपालिकेत होवो, याचा सर्वसामान्य नागरिकांशी काय संबंध येतो? येथील माणसाला विकास हवा आहे. क्षुल्लक राजकारणामुळे इतक्या वर्षांपासून परिसराचा विकास माघारला आहे. ग्रामपंचायत नगरपरिषदेत गेली तरी ठिक, आणि महानगरपालिकेत तिचा समावेश झाला तरी ठिक.**
**पिंटू सिंग, नागरिक**



**हा मुद्दा येथील जनतेसाठी सर्वात महत्वाचा आहे. ग्रामपंचायतीचे रुपांतरण कशातही झाले तरी काही हरकत नाही. मात्र विकासाच्या मुद्द्यावर एवढी मोठी लोकसंख्येने अवाढव्य वाढलेली ग्रामपंचायत सद्या मागे राहिली आहे. विकास करणाऱ्या स्वराज्य संस्थेमध्ये तिचा समावेश झाला पाहिजे.**
**- गजानन पांडे,**
**नागरिक**

# नागपूर विभागात २९ हजार हेक्टरमध्ये नुकसान

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १३ : अवकाळी पाऊस व गारपीटमुळे नागपूर विभागातील १३७७ गावांमध्ये २९ हजार २३१ हेक्टरमध्ये पिकांचे नुकसान झाले आहे. तर ८ जनावरांचा मृत्यू झाला. ६ मृत्यू गोंदिया तर नागपूर व वर्धा जिल्ह्यात १-१ जनावराचा मृत्यू झाला.

गेल्या काह दिवसापूर्वी अवकाळी पावसासोबतच गारपीट झाली. यामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. खरीप हंगामातील कापूस, तूरसोबतच रब्बी हंगामाती गहू, हरभरा पिकांना फटका बसला. नागपूर विभागात १३७७ गावांमध्ये २९ हजार २३१ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. सर्वाधिक ८ हजार ५६६ हेक्टरमध्ये नुकसान गडचिरोली जिल्ह्यात झाले. यामुळे खरीपसोबत रब्बी हंगामात सुद्धा शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागणार आहे.

### घर, गोठ्यांचे नुकसान

गारपीटमुळे १२१ घर व गोठ्यांचे नुकसान झाले.सर्वाधिक ७० घर, गोठ्यांचे नुकसान चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. गोंदियामध्ये १८ तर नागपूर जिल्ह्यात २७ घरांचे नुकसान झाले.गडचिरोलीत ५ तर वर्धा जिल्ह्यात एका घराचे नुकसान आहे.

| जिल्हा | बाधित गाव | बाधित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| नागपूर | ११ | ७४९५ |
| वर्धा | ५२ | ३०५५ |
| भंडारा | ८९ | ४९३४ |
| गोंदिया | १८५ | १४३७ |
| चंद्रपूर | ३२६ | ३७४३ |
| गडचिरोली | ७१४ | ८५६६ |

# वलनी, पोटा, दहेगाव शिवारातील पिके जमीनदोस्त

**सावनेर :** तालुक्यातील वलनी, रोहना, पोटा, दहेगाव आदी परिसरातील शिवारात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे कापूस, तूर, गहू, हरभरा, टमाटर आदी उभ्या पिकांसह फुलशेती व भाजीपाला पिके जमीनदोस्त होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी जि.प.सदस्य प्रकाश खापरे यांनी अधिकाऱ्यांना ही माहिती कळविली व शेतकऱ्यांना धीर दिला.

गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती राज्याचे पशुसंवर्धन दूध विकास, व्यवसाय, क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांना देण्यात आली. मंत्र्यांनी गुरुवारी दुपारी जळगाव येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर भेट देऊन पीक नुकसानीचे निरीक्षण केले. या भेटीदरम्यान शेतकऱ्यांना धीर देऊन झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित प्रशासकीय यंत्रणेला दिल्या.

याप्रसंगी जि.प.अध्यक्ष रश्मी बर्वे, उपाध्यक्ष सुमित्रा कुंभारे उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार प्रतापराव वाघमारे, जि.प.सदस्य प्रकाश खापरे, गटविकास अधिकारी दीपक गरुड, सभापती अरुणा शिंदे, पं.स.सदस्य पुष्पा करडभाजने, महसूल व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**जाहिर सुचना**

लता मंगेशकर हॉस्पिटल, सिताबर्डी नागपूर येथील ओ.पी.डी. (बाह्यरुग्ण विभाग) तसेच आय.पी.डी. (आंतररुग्ण विभाग) विभागाच्या इ.स. जुलै २०१५ ते डिसेंबर २०१६ चे दरम्यानच्या फाईल कालबाह्य झाल्यामुळे नष्ट करण्याचे ठरविले आहे. तरी ज्यांना या कालावधी दरम्यानचे कागदपत्र पाहिजे असतील त्यांनी योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करुन कागदपत्रांचे झेरॉक्स प्रत हि जाहिर सुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखे पासुन ७ दिवसाच्या आत मागुन घ्यावे त्या नंतर हे रेकॉर्ड नष्ट करण्यात येतील.

ANUP : 99230 301

# गारपीट नुकसानीची शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्या

## खा. कृपाल तुमाने यांची मुख्यमंत्र्यांना मागणी

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १३ : मंगळवारी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने जिल्ह्यात सुमारे ७ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. पीक तोडांवर असताना झालेल्या गारपिटीने शेतकऱ्यांचा घास हिरावला आहे. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी रामटेकचे शिवसेना खासदार कृपाल तुमाने यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली आहे.

रामटेक लोकसभा क्षेत्राचे दुसऱ्यांदा प्रतिनिधीत्व करणारे खासदार तुमाने म्हणाले, मागील काही दिवसांपासून ढगाळी वातावरणमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. तर मंगळवार (ता.११) जिल्ह्यात सर्वत्र अवकाळी पाऊस व गारपिट झाली. विशेषतः रामटेक, सावनेर, नागपूर ग्रामीण, कामठी, पारशिवनी या तालुक्यात सुमारे ७ हजार ४३१ हेक्टर मध्ये कापूस, गहू, हरभरा, तूर, भाजीपाला व फळपिकांचे नुकसान झाले. यामुळे ८ हजार ३३४ खातेधारकांना अवकाळी पावसाचा फटका



कृपाल तुमाने

बसल्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयाने घेतली आहे. या शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळाल्यास शेतकऱ्यांना नवी उभारी मिळून ते पुढील हंगामासाठी जोमाने कामाला लागतील. यामुळे नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तत्काळ नुकसानीचा मोबदला मिळावा अशी मागणीचे पत्र मुख्यमंत्र्यांना पाठविले आहे.

अवकाळी पावसामुळे व गारपीटीचा सर्वाधिक फटका तूर पिकाला बसला आहे. पारशिवनी, सावनेर,रामटेक, कामठी तालुक्यात बोर व आवळ्या ऐवढ्या गारा पडल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नुकसानीची आकडेवारी गोळा केली जात आहे. कोरोना महामारीच्या काळात शेतकऱ्यांच्या अथक प्रयत्नामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट राहिली.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या नागपूर जिल्ह्यातील व मतदार संघातील शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मोबदला देणे आवश्यक असल्याचेही तुमाणे म्हणाले.



**हिंगणाः निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना आमदार समीर मेघे.**

# मदतीसाठी आमदारांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**हिंगणा :** नागपूर ग्रामीण तालुक्यातील १२ जानेवारी रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे घोगली, भरतवाडा, गुमथळा, लोणारा, बैलवाडा, गोधनी (रेल्वे) या भागातील भाजीपाला व रबी पीकांची हानी झाली. या सर्व प्रभावीत शेतकऱ्यांना तात्काळ पीक नुकसान भरपाई देण्यात यावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी विमला.आर यांना गुरुवारी( ता.१३)आमदार समीर मेघे यांनी दिले.

रब्बी पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. यामुळे तातडीने पंचनामे करून त्या आधारावर नुकसान भरपाई मिळण्याबाबत जिल्हाधिकारी दौऱ्यावर असल्याने निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविले आहे. अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त भागातील आर्थिक संकटात आलेल्या शेतक-यांना पीकहानीसाठी नुकसान भरपाई देण्याबाबतचे निवेदन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना सुध्दा पाठविण्यात आले आहे. या शेतक-यांबाबत शासन स्तरावरून सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, अशी विनंती आमदार समीर मेघेंनी केली आहे.

CIN:L74999MH2016PLC284731

**Nirmitee Robotics India Limited**

(Formerly Known as Nirmitee Robotics India Private Limited)
H.O.:D3/2, MIDC Hingna, Nagpur. (MS) India 440028
Phone:+91-9422 881 677, Email:info@nirmiteerobotics.com
www.nirmiteerobotics.com

Nirmitee©
Innovation. Experience. Excellence

**एक्स्ट्रा ऑर्डिनरी जनरल मीटिंगची सूचना (ईजीएम)आणि ई-मतदानाविषयी माहिती**

भागधारकांना याद्वारे सूचित केले जाते की, **निर्मिती रोबोटिक्स इंडिया लिमिटेडच्या** सदस्यांची एक्सट्रा ऑर्डिनरी जनरल मीटिंग (ईजीएम)**शनिवार, 12 फेब्रुवारी रोजी 2022 रोजी दुपारी 03.00 वाजता डी 3/2, हिंगणा, एमआयडीसी, नागपूर, महाराष्ट्र – 440028** भारत स्थित कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात होणार आहे. ईजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार व्यवसायविषयक व्यवहार करण्यासाठी घ्यावयाच्या निर्णयांकरीता कंपनीच्या ईजीएम बोलावण्यासाठी भागधारकांना सूचना पाठवली जाईल. कंपनी कायदा, 2013 च्या कलम 108 च्या तरतुदींनुसार नियम 20 सह, कंपनी कायदा (व्यवस्थापन आणि प्रशासन) 2014 (सुधारित केल्याप्रमाणे) आणि सेबीच्या (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता)नियमन 44 विनियम 2015 (सुधारित केल्यानुसार) कंपनी सर्व आदरणीय सदस्यांना बैठकीत चर्चा करण्यासाठी व्यवहारविषयक व्यवसायाच्या मुद्यांवर आपले मौल्यवान मत नोंदवून मतदान करण्याकरीता ई-मतदान सुविधा देत आहे.बैठकीची सूचना कंपनीच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध असेल.

**https://www.nirmiteerobotics.com/investors/**आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर
**https://www.startupsbse.com/index.html**

**ईमेल पत्ता नोंदणी/अपडेट करण्याची पद्धत:**
जे भागधारक डीमटेरियलाइज्ड पद्धतीने शेअर्स धारण करत आहेत आणि त्यांच्याकडे डिपॉझिटरी सहभागींसोबत त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत/अपडेट केले नाहीत त्यांना विनंती करण्यात येत आहे की, संबंधित डिपॉझिटरी सहभागींसोबत त्यांचे ईमेल पत्ते नोंदणी/अपडेट करावेत.

**ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत:**
कंपनी तिच्या सर्व भागधारकांना त्यांचे मत नोंदविण्यासाठी रिमोट ई-मतदान सुविधा पुरवणार आहे. ईजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायांवर आणि बॅलेट पेपरद्वारे मतदान करण्याची सुविधा ईजीएम दरम्यान देखील उपलब्ध असेल. रिमोट ई-मतदान नोंदविण्याकरीता लॉग-इन क्रेडेन्शियल्सची सुविधा भागधारकांना ई-मेलद्वारे उपलब्ध करून दिली जाईल. ई-मतदान सुलभ करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या सेवा कंपनीने स्वीकारल्या आहेत. रिमोट ई-मतदान यंत्रणेद्वारे मत देण्याची प्रक्रीया ईजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केली जाईल आणि ती कंपनीच्या संकेतस्थळावर **https://www.nirmiteerobotics.com/investors/** येथे उपलब्ध असेल. तसेच, एनएसडीएलच्या संकेतस्थळावर **www.evoting.nsdl.com**. उपलब्ध असेल. रिमोट ई-मतदान कालावधी 09 फेब्रुवारी 2022 रोजी भारतीय वेळेनुसार सकाळी 9.00 वाजता सुरू होईल. हे मतदान 11 फेब्रुवारी 2022 रोजी भारतीय वेळेनुसार संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत सुरू राहणार असून या कालावधीत सदस्य त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून नोंदवू शकतात. यानंतर मात्र, एनएसडीएलच्या माध्यमातून इलेक्ट्रोनिक पद्धतीने रिमोट ई-मतदान मॉड्यूल बंद केले जाईल.
एकदा ठरावावर सदस्याने मत दिले की, त्यानंतर सदस्याला त्यात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
यासंदर्भातील कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत, तुम्ही भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) पहा. तसेच, भागधारकांसाठी ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका **www.evoting.nsdl.com** या संकेतस्थळाच्या डाउनलोड विभागात उपलब्ध आहे. या माहितीसाठी 18001020990 **किंवा** 1800224430 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावे किंवा **श्रीमती सोनी सिंग** यांना **evoting@nsdl.co.in**
या मेलवर विनंती पाठवा ज्या व्यक्तीने समभाग घेतले आणि कट-ऑफ तारखेनुसार शेअर्स धारण केल्यावर ईजीएमची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य असलेली व्यक्ती **evoting@nsdl.co.in** या मेलवर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतो.
तथापि, जर व्यक्ती आधीच एनएसडीएलमध्ये रिमोट मतदानासाठी नोंदणीकृत असेल तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मतदानासाठी वापरला जाऊ शकतो. ईजीएममध्ये बॅलेट पेपरद्वारे मतदान करण्याची सुविधाही सदस्यांना उपलब्ध करून दिली जाईल आणि ज्या सदस्यांनी आधी रिमोट ई-मतदानद्वारे आपले मत दिलेले नाही ते येथे आपला हक्क बजावू शकतील. या बैठकीच्या आधी रिमोट ई-मतदानद्वारे मतदान केलेले सदस्य देखील बैठकीला उपस्थित राहू शकतील पण, त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.
सभेला उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्ती वैयक्तिकरित्या किंवा प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे सर्व प्रतिनिधी विहित अर्ज/अधिकृततेनुसार मतदान नोंदवू शकतात. सभेला उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी अर्जावर असावी आणि कंपनीच्या कार्यालयात बैठकीच्या 48 तास आधी मतदानाची नोंदणी केली जावी.
ईजीएमच्या उद्देशाने कंपनीच्या सदस्यांची नावनोंदणी व शेअर ट्रान्सफर बुक्स 09 **फेब्रुवारी** 2022 पासून ते **१२ फेब्रुवारी २०२२** (दोन्ही दिवस समावेश) बंद राहतील.
पुढे, ई-मतदान हक्कासाठी आणि पात्र सदस्यांची नावे निश्चित करण्यासाठी 07 **फेब्रुवारी** 2022 ही कट-ऑफ तारीख म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

**ठिकाण : नागपूर**

**दिनांक : 14/01/2022**

**निर्मिती रोबोटिक्स इंडिया लिमिटेड करिता**
**जय प्रकाश मोटघरे**
डीआयएन : 07559929 **संपूर्ण वेळ संचालक**

# साडेसात हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान

## मंत्री सुनील केदारांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १३ : अवकाळी पाऊस व गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीमुळे नागपूर जिल्ह्यातील अनेक गावांना तडाखा बसला आहे. भाजापालासह गहू व हरभरा पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले. आज या भागाची पाहणी पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी केली.

शासकीय योजनेतून गुरांचा गोठा मंजूर करण्याच्या सूचना त्यांनी गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी दिल्या. आकस्मित निसर्गाचा कोपामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. राज्यशासनातर्फे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे. राज्य शासनातर्फे मदतीचा हात नक्कीच मिळेल. सर्वे करतांना शेतकऱ्यांचे खऱ्या अर्थाने नुकसान झाले आहे,त्यांना मदत करा. त्यासोबत ग्रामीण भागातील गरीब व झोपडीपटीतील लोकांचेही नुकसान झाले आहे. त्याचाही सर्वे करण्याच्या सूचना त्यांनी केली. त्यांनी नागपूर तालुक्यातील बोखारा, गुमथळा, बैलवाडा, कामठी तालुक्यातील गुमथी, लोणखैरी, सावनेर तालुक्यातील दहेगाव(रं), पारशिवणी तालुक्यातील इटगांव, भागीमहारी, रामटेक तालुक्यातील जमुनीया, टुयापार, घोटी, फुलझरी या गावातील अवकाळी पाऊस व गारपीटमुळे हानी झालेल्या शेतांची पाहणी केली.

जिल्ह्यात जवळपास ७ हजार ४९५ हेक्टर क्षेत्रांमध्ये कापूस, गहू,चणा, तूर, भुईमुग, भाजीपाला व संत्रा व टमाटर या फळपिकांचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका तुरीला बसला असून दीड हजार हेक्टरमधील तुरीचे नुकसान झाले आहे. या दौऱ्यात त्यांचेसमवेत जि.प. उपाध्यक्ष सुमित्रा कुंभारे, जि.प.चे कृषी सभापती तापेश्वर वैद्य, जि.प. सदस्य कुंदा राऊत, प्रकाश खापरे, राजू कुसुंबे, दुधाराम सव्वालाखे, शांता कुमरे, उपविभागीय अधिकारी इंदिरा चौधरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मिलींद शेंडे, माजी उपाध्यक्ष मनोहर कुंभारे तसेच पंचायत समितीचे सभापती, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### चार लाखांची मदत

मंत्री केदार यांनी नागपूर तालुक्यातील बोखारा गावास प्रथम भेट देऊन नैसर्गिक आपत्तीत मृत पावलेल्या हेमंत रोशन निवते यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. मृत मुलगा दुग्ध वाटपाचे काम करत होता. त्यामुळे त्याच्या कुटुंबियास पशुसंवर्धन विभागाच्या योजनेतून गाय व म्हसी देण्यासोबत सानुग्रह अनुदान म्हणून चार लाख रुपये देण्याची घोषणा पशुसंवर्धन मंत्री यांनी केली.



**नागपूर : नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना मंत्री सुनील केदार, सोबत जिल्हा परिषदेतील पदाधिकारी व सदस्य.**

# Both hold responsible posts, settle issues amicably: HC to Mayor, Shelar

## Won't file chargesheet against BJP MLA for two weeks, Mumbai Police tells HC

**OMKAR GOKHALE**
MUMBAI, JANUARY 13

THE BOMBAY High Court Thursday orally suggested that BJP MLA Ashish Shelar and BMC Mayor Kishori Pednekar should resolve issues between them "amicably" as both parties hold "responsible posts". It went on to issue notices in a plea filed by the MLA seeking to quash an FIR lodged against him for allegedly making objectionable remarks against Pednekar.

The Mumbai Police, through Additional Public Prosecutor J P Yagnik, assured the division bench of Justice Prasanna B Varale and Justice Anil S Kilor that it would not undertake any exercise pursuant to the lodging of FIR, including the filing of chargesheet, against Shelar till the next date of hearing two weeks later, which the court accepted.

Shelar had last month approached the HC after he was booked for making statements that allegedly outraged Pednekar's modesty during a press conference on December 4, last year. Shelar had slammed the mayor for her alleged delayed response in reaching out to the victims of a cylinder blast in Worli on November 30. He had asked if Pednekar had been sleeping for 72 hours. On December 8, Pednekar had approached the Marine Drive police station, following which a case was registered under sections 354 (A) (4) (sexual harassment) and 509 (word, gesture or act intended to insult the modesty of a woman) of the IPC.

Shelar, in his plea filed through advocate Rizwan Merchant, has claimed that the FIR is "blatantly false, vexatious, frivolous, concocted and a product of abuse of process of law".

On Thursday, Merchant sought an interim relief stating that his client, who is active in public life and the sitting MLA representing Bandra (West) for two consecutive terms, had merely held a press conference on an unfortunate incident at Worli to express his anguish. "If any action pursuant to the report is initiated against my client, he will be subjected to serious prejudice," Merchant argued.

The bench orally remarked, "Considering factual scenario, the petitioner is MLA (and) the respondent is also holding responsible position in these trying Covid-19 times. She is also representing the entire city of Mumbai... Why do you not solve it amicably, it will not send a good picture (in public). As a representative... you have liberty to take (up) issues of public importance and being a respectable and sensible person, better choice of words is also expected. Such incidents do occur in public life. Responsible persons are also expected to have a choice of words."




# Khar police arrests one for vishing fraud

**EXPRESS NEWS SERVICE**
MUMBAI, JANUARY 13

KHAR POLICE have arrested a youth from Jogeshwari for vishing, or phone scam. The man was allegedly part of a gang where one of them impersonated a manager from a finance company and offered an international credit card to the complainant, tricking him into revealing his bank details which were then used to transfer Rs 4.20 lakh from his account. The Indian Express had reported the cyber crime online, when the FIR was registered.

The accused, twenty-five-year-old Sagar Ghayal, was arrested on January 11. Ghayal works as an executive with a cab service provider. After the money was transferred from the complainant's account, the fraudsters used it to buy gift vouchers which were further used for buying products online. The fraudsters bought gold worth Rs 3.80 lakh and bought electronic items with the remaining Rs 40,000.

"The arrested accused was deputed by the gang to collect the gold which he sold for cash," said Mahadev Nimbalkar, inspector at Khar police station. "The fraudsters use this modus operandi of buying gift vouchers and online shopping as it becomes time-consuming for police to trace them and they think police will not come after them," said Netra Mule, sub inspector and cyber officer.

The 49-year-old complainant from Khar runs an ice cream and dairy business. As per the FIR registered on January 7, he received a text message on January 5, purportedly by a relationship manager of Citibank diners club, offering him an international credit card.

The message had a phishing link on which the complainant was asked to fill in his personal details. The money was debited from his account as soon as the complainant clicked on the link and filled in his personal and banking details.

**After the money was transferred from the complainant's account, the fraudsters used it to buy gift vouchers which were further used for buying products online**

# Dawood's nephew in Pakistan since September 2018, says Mumbai Police

**EXPRESS NEWS SERVICE**
MUMBAI, JANUARY 13

THE MUMBAI Police on Thursday said that fugitive underworld gangster Dawood Ibrahim's nephew Sohail Kaskar, who was arrested by the US agencies in 2015, had moved to Pakistan in September 2018.

The clarification came after some TV channels reported on Thursday that Kaskar had managed to give India the slip and moved to Pakistan without specifying when it has happened. Recently, a call intercepted by a central agency had confirmed that Kaskar was in Pakistan.

A senior officer from Mumbai Police told The Indian Express, "It is true that Sohail is currently in Pakistan. After his term in a US prison came to an end, India had tried to get him to the country. However, eventually he managed to get to Pakistan via Dubai in September 2018, where he has been ever since."

Kaskar is the son of Noora Ibrahim, who died in 2010 due to kidney failure. Kaskar, along with his aide Danish Ali, had come under the radar of US agencies in 2014 when he was trying to smuggle heroin from Pakistan to the US. Eventually, they were arrested by the agencies from Spain and handed over to the Federal Bureau of Investigation in the US.

Later, the Mumbai Police had sought the custody of Kaskar and Ali. A team from the Crime Branch had managed to get the custody of Ali, who was brought back to India. Kaskar, who has cases lodged against him in Mumbai, had contested India's claims of deportation.

**NATIONAL CENTRE FOR CELL SCIENCE, (NCCS) PUNE**
(An Autonomous Institution of the Department of Biotechnology, Government of India.)
Savitribai Phule Pune University Campus, Pune – 411007.

**Advt.No.- PMC/P-02/Online/2022**
**SUB: APPLICATIONS FOR PROJECT POSITIONS UNDER EXTRA MURAL PROJECTS**

Applications are invited for different positions to be filled purely on temporary basis at NCCS under different extra mural projects.

For the detailed specifications of the posts, the prescribed application format and other terms and conditions, please see our **Advt.No.PMC/P-02/Online/2022** under **Project Positions** in **Careers** tab on our website (www.nccs.res.in). For any updates please check our website. (Hindi, English & Marathi version of this advertisement is available on our website).

**Director, NCCS**

**All India Institute of Medical Sciences Rajkot- 360 001, Gujarat**
**AN INI CAB under PMSSY, Ministry of Health and Family Welfare**
**Government of India**

**Executive Director, AIIMS, Rajkot, Gujarat invites applications from eligible candidates for the following posts on Deputation Basis (for the period of 3 years) :**

| S.No. | Post : Rolling Advertisement | Group | Pay scale as per 7th CPC | Post |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Superintendent | A | Level 14 of 7th CPC | 1 |
| 2 | Financial Advisor | A | Level 13 of 7th CPC | 1 |
| 3 | Executive Engineer (Civil) | A | Level 11 of 7th CPC | 1 |
| 4 | Executive Engineer (Electrical) | A | Level 11 of 7th CPC | 1 |
| 5 | Assistant Controller of Examination | A | Level 11 of 7th CPC | 1 |
| 6 | Nursing Superintendent (NS) | A | Level 11 of 7th CPC | 1 |
| 7 | Administrative Officer | A | Level 10 of 7th CPC | 1 |
| 8 | Accounts Officer | A | Level 10 of 7th CPC | 1 |
| 9 | Assistant Administrative Officer | B | Level 7 of 7th CPC | 1 |
| | | | GRAND TOTAL | 9 |

**CONTRACTUAL : Retired Government Officers (Max Age 64 Years)**

**4 Post : Consultant Admin / Establishment / Finance / Store & Procurement**
**WALK IN INTERVIEW : 27.01.2022**

For further details please refer to AIIMS, Rajkot website : www.aiimsrajkot.edu.in under head "Recruitment". 1st cut off date is 30 days from the date of publication in Employment News.

Date : 14/01/2022 Deputy Director (Administration)







CIN:L74999MH2016PLC284731
**Nirmitee Robotics India Limited**
(Formerly Known as Nirmitee Robotics India Private Limited)
H.O.:D3/2, MIDC Hingna, Nagpur. (MS) India 440028
Phone:+91-9422 881 677, Email:info@nirmiteerobotics.com
www.nirmiteerobotics.com

Nirmitee© Innovation. Experience. Excellence

**NOTICE OF EXTRA ORDINARY GENERAL MEETING (EGM) AND E-VOTING INFORMATION**

Shareholders are hereby informed that an **Extra Ordinary General Meeting (EGM)** of the members of **Nirmitee Robotics India Limited** will be held on **Saturday, the 12th February, 2022 at 03.00 P.M.** at the Registered office of the Company at **D 3/2, Hingna, MIDC, Nagpur, Maharashtra- 440028** India to transact the businesses as set forth in the notice of the EGM which will be sent to the shareholders for convening EGM of the Company.

Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (as amended) and Regulation 44 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations 2015 (as amended) the Company is offering e-voting facility to all the respected members to enable them to cast their valuable vote on the item of business to be transacted at the meeting.

Notice of the meeting will also be available on the Company's website at **https://www.nirmiteerobotics.com/investors/** and on the website of stock exchange at **https://www.startupsbse.com/index.html.**

**Manner of registering/updating email address:**

Those shareholders who are holding shares in a dematerialized mode and have not registered/updated their email addresses with their depository participant(s) are requested to register/update their email addresses with the relevant depository participant(s).

**Manner of casting vote through e-voting:**

The Company will be providing remote e-voting facility to all its shareholders to cast their votes on the businesses as set forth in the notice of EGM and the facility of voting through ballot paper would also be available during the EGM. The login credentials for casting votes through remote e-voting shall also be made available to the shareholders through e-mail. The Company has availed the services of National Securities Depository Limited (NSDL) to facilitate e-voting. The detailed procedure for casting votes through remote e-voting shall be provided in the notice of EGM and the same will be available on the website of Company at **https://www.nirmiteerobotics.com/investors/** and on the website of NSDL at **www.evoting.nsdl.com.**

The remote e-voting period commences on **09th February 2022 at 9.00 a.m. IST** and ends on **11th February 2022 at 5.00 p.m. IST.** During this period, Members may cast their vote electronically. The remote e-voting module shall be disabled by NSDL thereafter.

Once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently.

In case of any queries, you may refer the Frequently Asked Questions (FAQs) for Shareholders and e-voting user manual for Shareholders available at the download section of www.evoting.nsdl.com or call on toll free no.: **1800 1020 990** and **1800 22 44 30** or send a request to **Ms. Soni Singh at evoting@nsdl.co.in**

A person who has acquired shares and become a member of the Company after the dispatch of notice of EGM and holding shares as of cut-off date, may obtain the login ID and password by sending a request at **evoting@nsdl.co.in.** However, if the person is already registered with NSDL for remote e-voting then the existing user ID and password can be used for casting vote.

The facility for voting through ballot paper shall also be made available at the EGM and members who have not already cast their vote by remote e-voting shall be able to exercise their right at the EGM. The Members who have cast their vote by remote e-voting prior to the EGM may also attend the EGM but shall not be entitled to cast their vote again.

Persons entitled to attend and vote at the meeting, may vote in person or by proxy/ through authorized representative, provided that all proxies in the prescribed form/authorization duly signed by the person entitled to attend and vote at the meeting are deposited at the Registered Office of the Company, not later than 48 hours before the meeting.

The Register of Members and Share Transfer Books of the Company shall remain closed from **09th February 2022 to 12th February 2022** (both days inclusive) for taking record of the Members of Company for the purpose of EGM.

Further, **07th February 2022** has been fixed as a cut-off date for the purpose of e-voting entitlement and for determining the names of eligible members.

**Place: Nagpur**
**Date: 14/01/2022**

**For Nirmitee Robotics India Limited**
**Sd/-**
**Jay Prakash Motghare**
DIN: 07559929 **Whole Time Director**

**Sálim Ali Centre**
**for Ornithology and Natural History,**
Anaikatty, Coimbatore- 641 108.

**Advt. No. SACON/SELECTION, 01 & 02/2022**

The Sálim Ali Centre for Ornithology and Natural History (SACON), Under the Ministry of Environment, Forest and Climate Change, Govt. of India wishes to engage **Accountant (UR-01)** and **Driver (UR-01)** (Indian National only) on direct recruitment. Please refer website **www.sacon.in** for detailed information regarding eligibility conditions and application format etc. Last date for receipt of completed application at SACON is **06.02.2022.**

Administrative Officer